जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

27 JUN 2022
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात राजर्षी शाहू जयंती कार्यक्रम उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क,
**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती रविवारी उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये सकाळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्याहस्ते छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले.




शिवाजी विद्यापीठात रविवारी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी अभिवादन केले. यावेळी अजित चौगुले, भारती पाटील, जयसिंगराव पवार, अजितसिंह जाधव, श्रीकृष्ण महाजन, आदी उपस्थित होते.

यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, वाणिज्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार, डॉ. भारती पाटील, निखिल गायकवाड, अवनिश पाटील, पी. एस. कांबळे, पी. एन. वासंबेकर, नंदकुमार मोरे, देविकाराणी पाटील, नीलांबरी जगताप, सोमनाथ पवार, आदी उपस्थित होते.

2 7 JUN 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कसबा बावड्यातील लक्ष्मीविलास पॅलेस येथील राजर्षी शाहू महाराज यांच्या जन्मस्थळी रविवारी सकाळी आठ वाजता १४८ व्या जयंतीनिमित त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी पालकमंत्री सतेज पाटील, ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, जयश्री जाधव, डॉ. डी. टी. शिर्के, विश्वास पाटील, जयसिंगराव पवार, इंद्रजित सावंत, वसंतराव मुळीक, राहुल रेखावार, डॉ. कादंबरी बलकवडे, संजयसिंह चव्हाण आदी उपस्थित होते.

### मान्यवर उपस्थित

राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस विविध मान्यवरांनी अभिवादन केले. यावेळी आमदार जयश्री जाधव, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, 'गोकुळ'चे अध्यक्ष विश्वास पाटील, ज्येष्ठ इतिहास संशोधक जयसिंगराव पवार, इंद्रजित सावंत, वसंतराव मुळीक, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे, जिल्हा पोलीस प्रमुख शैलेश बलकवडे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण आदी उपस्थित होते.

# 'शाहू संग्रहालया'चा पुढील टप्पाही पूर्ण करणार

## सतेज पाटील : पहिल्या टप्प्याचे लोकार्पण; १५० वी जयंती मोठ्या स्वरूपात करण्याचे नियोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कसबा बावड्यातील शाहू जन्मस्थळ संग्रहालयाचे पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण झाले आहे. त्याचे लोकार्पण करण्यात आले आहे. पुढील टप्प्याचेही काम करण्यात येईल. या माध्यमातून राजर्षी शाहू महाराज यांच्या कामगिरीचा इतिहास नव्या पिढीसमोर येईल, असे प्रतिपादन पालकमंत्री सतेज पाटील यांनी शनिवारी केले.

राजर्षी शाहू महाराज यांच्या १४८ व्या जयंतीनिमित्त आयोजित संग्रहालय लोकार्पणप्रसंगी ते माध्यमांशी बोलत होते. यावेळी ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांची प्रमुख उपस्थिती होती.

पालकमंत्री पाटील म्हणाले, शासनाच्या कोट्यवधींच्या निधीतून शाहू महाराज यांच्या जन्मस्थळी पहिल्या टप्प्यात अतिशय चांगले असे वस्तू संग्रहालय केले आहे. यातून शाहू महाराज यांचा इतिहास आताच्या पिढीस कळणार आहे. शाहूंचा समतेचा विचार लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम केले आहे. सन २०२४ मध्ये शाहू महाराज यांची १५० वी जयंती असेल. ही जयंती ही मोठ्या स्वरूपात करण्याचे नियोजन केले जाईल.

ग्रामविकास मंत्री मुश्रीफ म्हणाले, राजर्षी शाहू महाराज यांनी सर्व घटकांसाठी केलेले काम आजही आदर्शवत आहे. त्यांनी कमी कालावधीत शेतकरी, कष्टकरी, सामान्य लोकांसाठी चांगले काम केले. स्वत:च्या खजिन्यातून राधानगरी धरण बांधून शेतकऱ्यांना समृद्ध केले. ग्रामीण भागातील मुलांना शिकता यावे, यासाठी कोल्हापुरात बोर्डिंगची स्थापना केली.

2 7 JUN 2022 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांना संयमाने जगण्याची शिकवण शिक्षकांनी द्यावी

## डॉ. नागोराव कुंभार : राजर्षी शाहू जयंती समारंभानिमित्त व्याख्यान




**कोल्हापूर : राजर्षी शाहू व्याख्यानमालेत बोलताना डॉ. नागोराव कुंभार. व्यासपीठावर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. अशोक चौसाळकर, राजदीप सुर्वे, डॉ. शिवाजी जाधव आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिक्षणाच्या माध्यमातून बहुजन समाजाचा उद्धार होईल. शिकलेले लोक एकत्र येऊन सामाजिक भावनेने काम करतील, यासाठी राजर्षी शाहू महाराज यांनी कायदे करून ग्रामीण भागात शैक्षणिक चळवळ उभारली. आजच्या काळातील शिक्षकांनी विवेकी, वात्सल्यमूर्ती असले पाहिजे. शिक्षणातून सद्‌गुणी पिढी घडविण्याबरोबरच विद्यार्थ्यांना संयमाने जगण्याची शिकवण शिक्षकांनी द्यावी, असे प्रतिपादन डॉ. नागोराव कुंभार (लातूर) यांनी केले.

राजर्षी शाहू व्याख्यानमालेअंतर्गत 'राजर्षी शाहू महाराज यांचे शिक्षण विषयक तत्त्वज्ञान' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. कुंभार म्हणाले, दर्जेदार शिक्षणाने समाज समृद्ध होईल. बलवान होऊन बहुजन समाजाचा विकास होईल, असे शाहू महाराज यांचे मूलगामी चिंतन होते. शिक्षणातून स्वावलंबी बनून आत्मनिर्भरता येईल. जीवन जगण्याची कौशल्ये विकसित होतील. शिक्षणाशिवाय बहुजन समाजाचा उद्धार होणार नाही, असे शाहू महाराज यांना वाटत होते. शिक्षणाचे समाज इतर गोष्टींवर प्रभुत्व संपादन करील, असे त्यांना अभिप्रेत होते.

शिक्षण प्रक्रियेतून स्वतःची मते बनविता येणे आवश्यक आहे. शिक्षणातूनच उत्तम साहित्य निर्माण होईल. सांस्कृतिक पिढी घडेल. प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण होईल. समाज, देश शिक्षणाशिवाय पुढे जाणार नाही. अन्यथा समाज अज्ञानात गुरफटला जाईल. अशा स्थितीत शिक्षकांची भूमिका महत्त्वाची आहे. प्रास्ताविक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. सूत्रसंचालन पंडित कंदले यांनी केले. प्रशासनाधिकारी राजदीप सुर्वे यांनी आभार मानले. यावेळी ज्येष्ठ इतिहास अभ्यासक डॉ. जयसिंगराव पवार, ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

27 JUN 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठ

मुख्य प्रशासकीय भवनामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार प्रमुख उपस्थित होते. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार, डॉ. भारती पाटील, डॉ. निखिल गायकवाड, डॉ. अवनिश पाटील, डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. पी. एन. वासंबेकर, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. देविकाराणी पाटील, डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. सोमनाथ पवार उपस्थित होते. यानंतर मान्यवरांनी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू संशोधन केंद्र येथेही महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमापूजन करताना मान्यवर.

27 JUN 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकराजाला मानाचा मुजरा

## विविध संस्था संघटनांकडून विविध कार्यक्रमाचे आयोजन

प्रतिनिधी
कोल्हापूर

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध संस्था, संघटनांकडून शाहू महाराज यांच्या फोटो, पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून मानाचा मुजरा करण्यात आला. व्याख्यान, संगीत स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धांचे आयोजन केले होते.

**विवेकानंद महाविद्यालय**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त शाहू महाराज यांच्या पुतळ्यास प्रशासकीय सेवक रवी चौगुले यांच्या हस्ते राजर्षी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. हा कार्यक्रम विवेकानंद कॉलेजमध्ये 'शाहू फुले आंबेडकर अध्यासन' व इतिहास विभागाच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात आला. यावेळी डॉ. एस. आर. कट्टीमनी, प्रा. समीक्षा फराकटे, एन. सी. सी. विभाग प्रमुख लेफ्टनंट प्रा. जितेंद्र भरमगोंडा, प्रा. नम्रता ढाळे, डॉ. कैलास पाटील, डॉ. सोमनाथ काळे, प्रा. बी. के. गावीत, प्रा. सुप्रिया पाटील, सदानंद दुर्गुळे, एस. पी. देसाई, ए. एम. बोंगे, आर. जी. राणे, एस. व्ही. चरापले आदी उपस्थित होते.

**मुस्लिम बोर्डिंग**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे चेअरमन गणी आजरेकर, प्रशासक कादर मलबारी, उपाध्यक्ष आदिल फरास, नेहरू हायस्कूलचे चेअरमन रफिक मुल्ला, समस्य रफिक शेख, लियाकत मुजावर, अल्ताफ झांजी, पापा बागवान, जहांगीर अत्तार, फारूक पटवेगार, मलिक बागवान, सदानंद डिगे, अर्चना पाथरे आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार आदी मान्यवर.**

### शिवाजी विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठातर्फे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार, डॉ. भारती पाटील, डॉ. निखिल गायकवाड, डॉ. अवनिश पाटील, डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. पी. एन. वासंबेकर, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. देविकाराणी पाटील, डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. सोमनाथ पवार आदी उपस्थित होते.

तरूण भारत

# ‘बहुजनासाठी शाहूंनी शिक्षणाची दारे खुली केली’

कोल्हापूर : बहुजन समाजामधील तरूणांचे अज्ञान व शोषण दूर करावयाचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. शिक्षणाची ही दूरदृष्टी ओळखूनच राजर्षी शाहू महाराज यांनी शिक्षणासाठी बंडखोरी करून, शिक्षणाची व ज्ञानाची दारे खुली केली असे प्रतिपादन लातूरचे वक्ते डॉ. नागोराव कुंभार यांनी केले.
शाहू स्मारक येथे सुरू असलेल्या राजर्षी शाहू व्याख्यानमालेतील चौथे पुष्प गुंफताना ते बोलत होते. ‘राजर्षी शाहूंचे शिक्षण विषयक तत्वज्ञान“ या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी.टी शिर्के हे होते. राजषीं शाहू महाराज हे लोकांच्या हृदयातील राजे होते. त्यांनी राजसता व अर्थसता यांचा अभ्यास करूनच,. राजसंता ही भोगण्यासाठी नसून, जनतेसाठी आहे हे ओळखूनच त्यांनी शिक्षणाची दारे खुली केली असल्याचे त्यांनी सांगितले. कुलगुरू प्रा. डॉ. डी.टी. शिर्के यांचे भाषण झाले. प्रारंभी मान्यवरांच्या उपस्थितीत राजर्षी शाहू महाराज यांच्या पुतळयास अभिवादन करण्यात आले. प्रस्तावना व परिचय डॉ. शिवाजी जाधव, स्वागत पंडित कंदले तर आभार राजदीप सुर्वे यांनी मानले.